॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

जा.क्र.कबचौ उमवि/७-क/हस्तदेय/२०२५ दि.१३.०९.२०२५

प्रति,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगांव
यांचेशी संलग्नीत एम.एस्सी.पदव्युत्तर वर्गाचे संलग्नीत महाविद्यालयांचे मा.प्राचार्य यांना..

विषय: एम.एस्सी पदव्युत्तर वर्गाच्या प्रवेशा संदर्भात..

महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, एम.एस्सी.पदव्युत्तर वर्गाच्या प्रवेशाबाबत असे निर्दशनास येते की, काही विद्यार्थी हे भाग-१ करिता CBCS [२०२१] Pattern करिता प्रवेशित होते. त्याअनुषगांने त्यांनी भाग-२ करिता त्याच पॅटर्न मध्ये प्रवेश घेवून त्यानुसारच परीक्षा देणे अपेक्षित आहे.

परंतु, विद्यापीठाच्या असे निर्दशनास आलेले आहे की, सदर विद्यार्थी भाग-१ करिता, CBCS [२०२१] Pattern मध्ये प्रवेशित असतांना, महाविद्यालयाने त्यांचा भाग-२ करिताचा प्रवेश हा NEP २०२० [June-२०२३] Pattern मध्ये प्रवेश दिलेला असल्यामुळे, निकाल घोषित करण्यास विद्यापीठास तांत्रिक अडचणी येत असल्यामुळे त्याचा भाग-२ चा निकाल जाहिर करता येत नाही.

त्यामुळे, महाविद्यालयाने आपल्या स्तरावर सदर. विद्यार्थी भाग-१ करिता ज्या पॅटर्न मध्ये प्रवेशित होता त्यानुसारच भाग-२ करिता प्रवेश देवून त्याप्रमाणेच विद्यार्थ्यास परीक्षा अर्ज सादर करावयास सांगावे जेणे करुन निकाल जाहिर करण्यास अडचणी निर्माण होणार नाहीत. कृपया यांची नोंद घ्यावी,ही विनंती.

म.कळावे,

मा.संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ,
कबचौ उमवि,जळगांव